CMYK

देवाने धाडला दुःखीतांचा वाली : खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून गंभीर अपघातग्रस्त रुग्णासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची मदत मंजूर >>पान 2

सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार येथे जागतिक सर्प दिनाच्या निमित्ताने 'सर्प शिक्षा अभियान' उत्साहात साजरे >>पान 3

स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

आपल्या आजुबाजूच्या लोकांना सन्मान द्या.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 305 ■ शनिवार, दि. 19 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




KBC 17 साठी अमिताभ बच्चन यांनी घेतलंय 'इतक्या' कोटींचं मानधन; बिग बींनी सलमान खानलाही टाकलं मागे

आतील पान

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वाजणार बिगुल

**मुंबई/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अखेर पक्ष संघटनेत बदल केले. सात वर्षे पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद भूषवणारे माजी मंत्री जयंत पाटील यांच्या जागी साताऱ्याचे शशिकांत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून त्यांचे राजकारण पश्चिम महाराष्ट्र आणि मराठा समाजाभोवती केंद्रित राहिले. गेल्या २६ वर्षांत या पक्षाला मुंबई आणि विदर्भात प्रभाव मिळवण्यात अपयश आले. समाजातील सर्व घटकांचा पाठिंबा त्याला मिळू शकला नाही. अजित पवारांच्या बंडानंतर पक्षाचे दोन भाग झाले.**

## पवार अन् ठाकरे गटाची लागणार कसोटी?

लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाला यश मिळाले पण गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ४१ आमदार निवडून आले तर शरद पवारांच्या पक्षाचे फक्त १० आमदार निवडून आले. महायुती पुन्हा सत्तेत आली. अशा परिस्थितीत शरद पवारांच्या पक्षातही अनिच्छा आणि निराशेची स्थिती दिसून आली. काही नेते भाजपमध्ये किंवा अजित पवारांच्या पक्षात सामील झाले. कार्यकर्त्यांमध्येही गोंधळ पसरू लागला. अशा परिस्थितीत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने आणि ग्रामीण भागात आपला प्रभाव टिकवून ठेवण्याची गरज असल्याने, पक्षातील आळस दूर करून त्यात नवा उत्साह निर्माण करण्याच्या उद्देशाने जयंत पाटील यांच्या जागी शशिकांत शिंदे



यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पवार यांच्यासारखे तरुण नेते विचारत होते की जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदावर किती काळ ठेवणार? जयंत पाटील म्हणाले की अध्यक्षपद सोडले म्हणजे ते पक्ष सोडतील असे नाही, परंतु सध्याच्या राजकारणाकडे पाहता कोण कुठे जाईल हे सांगता येत नाही! महाराष्ट्रात शरद पवार आणि उद्धव ठाकरे भाजपच्या आक्रमक राजकारणाशी लढत आहेत. शरद पवारांकडे स्वबळावर ६० आमदार निवडून आणण्याची क्षमता होती पण पक्ष फुटल्यानंतर त्यांची शक्ती कमी झाली. पक्षाचा प्रदेशाध्यक्ष कोणाला बनवले तरी पक्षाचा खरा चेहरा शरद पवार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा पाच दशकांचा प्रभाव आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेससाठी अस्तित्वाची लढाई ठरतील. शहरी भागात पक्षाची फारशी पकड नाही पण जिल्हा परिषद आणि नगर पालिका निवडणुकीत यशस्वी होण्याची क्षमता पक्षात आहे.

## विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपुरात



**मुंबई/प्रतिनिधी :** तीन आठवडे मुंबई सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. सत्ताधारी आणि विरोधकांचा गोंधळ, सभात्याग, आमदारांच्या कार्यकर्त्यांमधील हाणामारी या आणि अशा विविध घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन विशेष चर्चे त राहिले. आता हिवाळी अधिवेशन सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी नागपुरात होणार आहे, अशी घोषणा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना हिवाळी अधिवेशनाच्या तारखेबद्दलचा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. तसेच राज्यपालांनी दिलेल्या संदेशानुसार पावसाळी अधिवेशन स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा नार्वेकर यांनी केली. अधिवेशनात झालेल्या कामकाजाचा आढावा सांगताना ते म्हणाले, या काळात एकूण १५ बैठका झाल्या आणि एकूण १३३ तास ४८ मिनिटे कामकाज झाले, तर ४५ मिनिटांचा वेळ वाया गेला.

यात दिवसाचे सरासरी कामकाज ८ तास ५५ मिनिटे झाले. यामध्ये १५२ लक्षवेधी आणि ९२ तारांकीत प्रश्नांवर चर्चा झाली. विधानसभेत १४ शासकीय विधेयके सादर झाली. १५ विधेयकांवर सहमती झाली, तर एक मागे घेण्यात आले, अशी माहिती अध्यक्ष नार्वेकर यांनी दिली.

## रक्षाबंधनानिमित्त राखी व भेटवस्तू पाठवण्यासाठी डाक विभागाची 'विशेष राखी मेल सेवा'

**बुलडाणा/प्रतिनिधी :** रक्षाबंधन हा भाऊ व बहिणीचा, बंधुत्वाचा, प्रेमाचा आणि विश्वासाचा पवित्र सण यंदा दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होणार आहे. या विशेष प्रसंगी आपल्या बहिणींनी पाठवलेली राखी वेळेत पोहचावी यासाठी बुलढाणा डाक विभागाने विशेष राखी मेल सेवा सुरू केली आहे.बुलडाणा विभागातील सर्व प्रधान डाकघरे, उप डाकघरे आणि शाखा डाकघरे यामधून नागरिक राखी, ग्रीटिंग काड्र्स आणि भेटवस्तू अत्यंत सहजतेने आणि विश्वासाने देशभर पाठवू शकणार आहेत. विशेष राखी मेल व्यवस्थेअंतर्गत राख्या प्राधान्याने वितरित केल्या जातील. स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पार्सल सेवांतर्गत राखी आणि गिफ्ट्स जलद व सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी. ट्रॅकिंग सुविधेंतर्गत स्पीड पोस्टद्वारे पाठवलेली राखी व गिफ्ट्स यांचे इंटरनेटद्वारे सहज ट्रॅकिंग करता येईल. परदेशातही राखी पाठवण्याची सोय या सुविधेंतर्गत इतर देशांतही राखी स्पीड पोस्टने पाठवता येईल.

सर्व नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा आणि रक्षाबंधनाचा आनंद आपल्या प्रिय व्यक्तींशी डाक विभागाच्या मदतीने साजरा करावा. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या डाकघराशी संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश बा. आंभोरे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## आमदार रोहित पवार आणि एका पोलीस अधिकाऱ्यामध्ये बाचाबाची



**मुंबई/प्रतिनिधी :** गुरुवारी विधानभवन परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादाने गंभीर स्वरूप धारण केले. या वादात पडळकरांच्या कार्यकर्त्यांनी आव्हाडांच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचा प्रकार समोर आला. या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात पडळकरांचे कार्यकर्ते आव्हाडांच्या कार्यकर्त्याला मारहाण करताना दिसत आहेत. या घटनेनंतर रात्री उशिरा पोलिसांनी आव्हाडांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना अटक केली, ज्यामुळे हा वाद आणखी चिघळला. या अटकेनंतर जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार हे दोन्ही आमदार मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात पोहोचले. तिथे रोहित पवार आणि एका पोलीस अधिकाऱ्यामध्ये बाचाबाची झाली.

## सहकार क्षेत्राला भक्कम करण्यासाठी शासन कटीबद्ध – सहकार मंत्री

**मुंबई /प्रतिनिधी :** राज्यातील सहकार चळवळ भक्कम पायावर उभी रहावी आणि त्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम व्हावी यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितले. २६० च्या प्रस्तावाला उत्तर देताना श्री. पाटील बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यातील मध्यवर्ती सहकारी बँका या ग्रामीण व कृषी वित्त पुरवठ्याचे आधारस्तंभ असल्याचे सांगून सहकार मंत्री पाटील म्हणाले की, अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी शासनाने ७६९ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. 'लाडक्या बहिणीं'साठी सहकारी संस्था स्थापण्यास मान्यता दिली आहे. शासकीय ठेवी जिल्हा सहकारी बँकेत ठेवण्याच्या सूचना सर्व जिल्ह्यातील यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. धुळे व नंदुरबार जिल्ह्यांसाठी वेगळी जिल्हा बँक स्थापण्यासाठी अहवाल मागवण्यात आला आहे. राज्यात नव्याने ५४ गोदामे बांधण्यात आली असून आणखी २५ गोदामे बांधण्याचे नियोजन करण्यात आल्याचेही श्री. पाटील यांनी सांगितले.

## राज्यात गणेशोत्सव होणार आता राज्य महोत्सव – सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** शेकडो वर्षाची घरगुती गणेशोत्सव परंपरा व अनेक वर्षापासूनची सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक समरसतेचे मानबिंदू आहे. त्यामुळे राज्यात आता गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज विधानपरिषद आणि विधानसभेत निवेदनाद्वारे केली.

मंत्री ॲड. शेलार म्हणाले, गणेशोत्सवाचे महत्त्व व ओळख संपूर्ण जगभर व्हावी, आपल्या परंपरेची आधुनिकतेशी सांगड व्हावी, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे असणारे गणेशोत्सव हे व्यासपीठ आणखी मजबूत व्हावे, गणेशोत्सवासंबंधी सर्व घटक एकत्र जोडले जावेत, पर्यटन वाढावे, आपल्या समृद्ध परंपरा रितीरिवाजांचे जतन–संवर्धन व्हावे आणि महाराष्ट्राचे स्थान जगाच्या नकाशावर ठळक व्हावे, यासाठी गणेशोत्सव आता राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

राज्याच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा पाया सामाजिक एकरूपतेने घातलेला आहे. ही एकरूपता निर्माण होण्यासाठी गणेशोत्सवाने मोलाची भूमिका पार पडलेली आहे. गणेशोत्सवाचे परंपरागत स्वरूप कायम ठेवून त्यास आधुनिकतेची जोड देण्यासाठी आणि राज्याचा प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या या महोत्सवाशी जोडला जाण्यासाठी राज्य महोत्सव होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र शासन सुलभकर्ता म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असेही सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

एका लोगोचे अनावरण, व्याख्यानमाला, अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन करण्यात येईल. राज्यातील महत्वाची मंदीरे आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे यांचे ऑनलाइन दर्शन घरबसल्या घेता येण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ अंतर्गत तालुका स्तरावर स्पर्धेद्वारे विविध पारितोषिके देण्यात येतील. घरगुती गणेशोत्सव आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो, व्हिडिओ क्लिप्स



पोर्टलवर येण्यासाठी एक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येईल. ज्या चित्रपटांमधून गणपती विषयक परंपरा, कला संस्कृती दर्शवलेली आहे अशा चित्रपटाचा विशेष गौरव करण्यात येईल. गणेशोत्सवावर आधारित टपाल तिकीट आणि नाणे काढण्यात येईल. गणेशोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यभरातून गणपतीविषयक रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात येईल. गणेशोत्सवाच्या निमित्ताने ड्रोनशो चे आयोजन करणे प्रस्तावित आहे. या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी यासाठी देशभरात प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रम, उपक्रम हाती घेण्यात येतील. गणेश उत्सवाच्या दरम्यान प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभीकरण करण्यात येईल.

## दिव्यांगांसाठीच्या अनुदानात १००० रुपयांची वाढ मंत्री अतुल सावे यांचे विधान परिषदेत निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज विधान परिषदेत महत्त्वाचे निवेदन करत राज्यातील दिव्यांग बांधवांसाठी दरमहा २,५०० रुपये अनुदान देण्याचे घोषित केले.राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांतर्गत मिळणाऱ्या दरमहा १,५०० रुपये अनुदानात आता थेट १००० रुपयांची वाढ करून ते २,५०० रुपये करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रवण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्त वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा २,५०० रुपये इतके अर्थसहाय्य मिळणार आहे.

## राज्यातील खासगी शाळेतील शिक्षकांच्या वेतनासाठी ९७०.४२ कोटीच्या खर्चास मान्यता : मंत्री दादाजी भुसे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** राज्यातील खासगी विनाअनुदानीत व अंशतः अनुदानीत शाळा, तुकड्या आणि त्यामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी वेतन अनुदानाच्या पुढील टप्प्यासाठी ९७०.४२ कोटी रुपये इतक्या खर्चास राज्य शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले, या निर्णयाच्या राज्यातील खासगी विनाअनुदानीत व अंशतः अनुदानीत ६ हजार ७५ शाळा आणि ९ हजार ६३१ तुकड्यांमधील ४९ हजार ५६२ शिक्षकांना लाभ होणार आहे. याशिवाय २ हजार ७१४ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नव्याने २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. हे वेतन अनुदान १ ऑगस्ट २०२५ पासून लागू होणार आहे. तसेच अनुदानाच्या निकषानुसार अपात्र होणाऱ्या शाळा व तुकड्यांना स्वयं अर्थसहाय्यीत अधिनियमांच्या तरतूदीनुसार विवक्षित शाळा म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आल्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी निवेदनाद्वारे सांगितले.

## विधिमंडळ आवारात झालेल्या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करा – खासदार सुनील तटकरे




**जालना/प्रतिनिधी :** विधिमंडळ आवारात काल झालेल्या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्याची माहिती राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली आहे. ते जालन्यात बोलत होते. विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषदेच्या सभापतीमार्फत या घटनेची चौकशी करण्याची मागणी केल्याचं देखील तटकरे यांनी नमूद केल आहे. ठराविक लोकप्रतिनीधींकडून घडलेल्या घटना या दुर्दैवी असल्याचे देखील तटकरे म्हणाले आहेत.

## पडळकर-आव्हाड राड्याप्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांचा मोठा निकाल; फौजदारीचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमधील वादावर अखेर विधानसभा अध्यक्षांनी कारवाईला सुरुवात केली आहे. विधिमंडळ सभागृह सुरक्षा समितीच्या अहवालानंतर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही आमदारांनी खेद व्यक्त करावा अशा सूचनाही केल्या आहेत. आमदार पडळकर आणि आमदार आव्हाड यांच्याशी संबंधित सर्जेराव बबन टकले (वय ३७) आणि नितीन हिंदुराव देशमुख (वय ४१) यांच्यावर फौजदारी करण्यात येत असल्याचे नार्वेकर यांनी सांगितले. त्यांच्याविरुद्ध चौकशी करुन विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्यासाठी विधानसभा विशेषाधिकार समितीकडे दोघांचे प्रकरण वर्ग करत आहे, असेही विधानसभा अध्यक्षांनी म्हटले.

१७ जुलै २०२५ रोजी सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना काही सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणले आहे की, विधानभवन इमारतीच्या प्रवेशद्वारावार मेन पोर्च येथे दोन अभ्यागतांमध्ये मारामारी झाली आहे. याबाबत विविध प्रसारमाध्यमांवर बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. विधानमंडळाचे सदस्य यांच्याबाबत टीकाटिप्पणी करण्यात आली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून सभागृहाच्या प्रसिमेमध्ये घडली आहे. याबाबत मी विधिमंडळाचे मुख्य सुरक्षा अधिकारी यांना तात्काळ या घटनेचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या अहवालातून दिसून येते की, १७ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजून ४५ मिनिटांनी मेन पोर्चमध्ये अचानक दोन अभ्यागतांमध्ये मारामारी सुरु झाली. ही मारामारी सुरक्षा पथकाने तात्काळ थांबवली. नमूद इसम ांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यापैकी नितीन हिंदुराव देशमुख ( वय ४१) याने जितेंद्र आव्हाडांचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले. तर दुसरा इसम सर्जे राव बबन टकले (वय ३७) याने गोपीचंद पडळकरांचा यांचा मावसभाऊ असल्याचे सांगितले.

याबाबत संबंधितांविरोधात आणि त्यांच्यासोबतच्या सहा ते सात जणांविरोधात मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना व अधिकृत प्रवेशिका नसताना अनधिकृतपणे हे अभ्यागत विधानभवनाच्या आवारात आले. त्यांनी मारामारी करुन आक्षेपार्ह कृत्य केल्याच दिसून येते. विधानमंडळाच्या



प्रसिमेममध्ये अशी घटना यापूर्वी कधीही झालेली नाही. सदस्यांनी विधानमंडळात येताना कोणत्याही अनाहूत व्यक्ती व अभ्यंगत यांना विधिमंडळाच्या परिसरात आणण्याची कोणतीही आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. तसेच अभ्यांगत कोणत्याही कारणामुळे विधानभवनात आले तर त्यांच्या वर्तणुकीची जबाबदारी संबंधित सदस्याने घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अभ्यांगताच्या आक्षेपार्ह वर्तणुकीसाठी सदस्यांवर जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने मी सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणत आहे की, विधिमंडळाचे सदस्य म्हणून आपले कर्तव्य पार पडत असताना आपणावर विधिमंडळाच्या सर्वोच्च परंपरा राखण्याचे उत्तरदायित्त्व आणि जबाबदारी आहे. विधिमंडळाला लोकशाहीचे मंदिर संबोधले जाते. त्यामुळे, दोन्ही सदस्यांनी सभागृहात खेद व्यक्त करावा, अशा सूचनाही अध्यक्षांनी केल्या होत्या. गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांनी या दोघांना सभागृहात आणल्याबद्दल सभागृहात खेद व्यक्त करावा, तसेच, भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची दखल घ्यावी, अशा सूचनाही विधानसभा अध्यक्षांनी दिल्या आहेत.

CMYK

## बहुविध प्रतिभेचे धनी डॉ जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल – भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्र्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथे सारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञाना सारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्र्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# देवाने धाडला दु:खीतांचा वाली : खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून गंभीर अपघातग्रस्त रुग्णासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची मदत मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ/प्रतिनिधी :** कधीकधी संकटं अचानक कोसळतात आणि अशावेळी कोणीतरी देवदूत बनून धावून येतो, याचं जिवंत उदाहरण म्हणजे नुकताच वर्धा जिल्ह्यातील एक अपघातग्रस्त रुग्ण आणि त्याला मिळालेली मदत.

किशोर खेतूलाल भुतडा, रा. कारला रोड, शिवाजीनगर, वर्धा हे मार्केटहून मोटारसायकलने घरी जात असताना, मागून येणाऱ्या एका चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांना मानेवर आणि हाताला गंभीर दुखापत झाली. प्राथमिक उपचारासाठी त्यांना वर्धा येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृतीच्या गंभीरतेमुळे त्यांना तातडीने कस्तुरबा गांधी रुग्णालय, सेवाग्राम येथे हलवण्यात आले. तेथूनही पुढील विशेष उपचारासाठी न्यूरॉन हॉस्पिटल, नागपूर येथे दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी चार लाख रुपयांच्या उपचार खर्चाची अपेक्षा व्यक्त केली.

रुग्णांची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असल्याने उपचाराचा खर्च उचलणे कुटुंबियांसाठी अशक्यप्राय होते. याच वेळी निलेश सोमाणी (वाशिम) यांनी ही माहिती खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या निदर्शनास आणून दिली आणि मदतीची विनंती केली.

खासदार संजयभाऊ देशमुख यांनी तत्काळ ''माणुसकी हाच मोठा धर्म आहे'' हे ध्यानात ठेवून, मतदारसंघाबाहेर असलेल्या रुग्णालाही मदतीचा हात दिला. त्यांनी आपल्या स्वीय सहाय्यक गजानन





कदम यांना तातडीने कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी अर्ज करण्याचे निर्देश दिले. गजानन कदम यांनी स्वतः पुढाकार घेऊन निलेश सोमाणी यांच्याशी संपर्क साधला व आवश्यक कागदपत्रे वेळेत जमा केली. त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून रामेश्वर नाईक (प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभाग) आणि अँड. विशाल ठाकरे यांच्या सहकार्याने किशोर भुतडा यांच्या उपचारासाठी एक लाख रुपयांची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर करून घेतली.

ही मदत मिळाल्यानंतर किशोर भुतडा व त्यांच्या कुटुंबियांनी ''कठीण काळात देवासारखे मदतीला आले'' असे म्हणून खासदार संजयभाऊ देशमुख, रामेश्वर नाईक, अँड. विशाल ठाकरे, निलेश सोमाणी आणि गजानन कदम यांचे मन:पूर्वक आभार मानले.

ही घटना केवळ एका मदतीची नोंद नसून, ''राजकारण हे समाजकारणासाठी असावं'' याचं जिवंत उदाहरण आहे. गरीब, गरजू आणि संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात देणारा देवाने धाडलेला माणूस म्हणजे खासदार संजयभाऊ देशमुख अशीच लोकभावना पुन्हा एकदा दृढ झाली आहे.

# KBC 17 साठी अमिताभ बच्चन यांनी घेतलंय 'इतक्या' कोटींचं मानधन; बिग बींनी सलमान खानलाही टाकलं मागे

**मुंबई/प्रतिनिधी :** 'टेलिव्हिजनचा सर्वात महागडा होस्ट' हा टॅग आता सलमानकडे राहिलेला नाही. एका दिग्गज अभिनेत्यानं सलमान खानकडून हा टॅग हिसकावून घेतला आहे. एक दिग्गज अभिनेता आता 'टेलिव्हिजनचा सर्वात महागडा होस्ट' ठरला आहे.

हा टॅग दुसऱ्या तिसऱ्या कोणा सुपरस्टारला मिळाला नसून प्रत्यक्ष अमिताभ बच्चन यांना मिळाला आहे. अमिताभ बच्चन लवकरच त्यांच्या हिट क्विझ शो 'कौन बनेगा करोडपती'च्या १७ व्या सीझनसह टीव्हीवर पुनरागमन करत आहेत. त्यांनी २००० मध्ये केबीसी होस्ट म्हणून सुरुवात केली. अमिताभ बच्चन यांनी तिसरा सीझन वगळता सर्व सीझन होस्ट केले. तिसरा सीझन शाहरुख खानने होस्ट केला होता. त्यानंतर अमिताभ यांनी पुन्हा 'केबीसी'ची जबाबदारी स्वीकारली. अमिताभ बच्चन भारतीय टेलिव्हिजनवरील सर्वांत महागडे होस्ट ठरले आहेत. सलमान खान टीव्हीवर बिग बॉस होस्ट करतो आणि त्याला टीव्हीवरील 'सर्वात महागडा होस्ट' म्हटलं जायचं, पण आता मात्र सलमान खान नाहीतर अमिताभ बच्चन 'टेलिव्हिजनचा सर्वात महागडा होस्ट' ठरले आहेत.

# ५ वर्षांपासून जन्मठेपेतील फरार आरोपी पत्नीला भेटायला आला; आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकला





**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** जन्मठेपेतील फरार आरोपी पत्नीला भेटण्यासाठी घरी आला असता बीड पोलिसांनी बड्या शिताफीनं त्याला अटक केली आहे. बहिणीच्या खून प्रकरणात जन्मठेप झालेला आरोपी ५ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देऊन फरार होता. मात्र पत्नीला भेटण्यासाठी बीडमध्ये आल्याची माहिती पोलिसांना मिळताच, आरोपीच्या मुस्क्या आवळण्यास पोलिसांना यश आले आहे. विठ्ठल उर्फ सोनू कळवणे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, बहिणीच्या खून प्रकरणात त्याला जन्मठेपेची शिक्षा लागली होती. मात्र जन्मठेप लागल्यानंतर पोलिसांच्या तावडीतून तो पसार झाला. आरोपीच्या बहिणीचे एका तरुणासोबत प्रेम संबंध होते, दोघांना लग्न करायचे होते. मात्र विठ्ठलचा याचा विरोध होता. यातून त्याच्या बहिणीने आणि तिच्या प्रियकराने २०१४ मध्ये विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. यादरम्यान खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना, विठ्ठलने रुग्णालयात जाऊन बहीण आणि तिच्या प्रियकरावर प्राण घातक हल्ला केला. यात बहिणीचा मृत्यू तर प्रियकर गंभीर जखमी होता. या प्रकरणात सत्र न्यायालयाने विठ्ठल कळवणे याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर तो पोलिसांच्या तावडीतून पसार झाला. तो घरी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळताच, त्याला अटक करण्यात आली.

# दिग्रसला व्हॉइस ऑफ मीडियाची कार्यकारिणी गठीत



**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**दिग्रस :** 'व्हॉइस ऑफ मीडिया' दिग्रस तालुका शाखेची नवी कार्यकारिणी औपचारिकरित्या गठीत करण्यात आली आहे. या बैठकीत पत्रकार बांधवांनी एकत्र येऊन नव्या कार्यकारिणीला एकमुखी पाठिंबा दर्शवला.

या कार्यक्रमाचे आयोजन दिग्रस शहरात करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य जय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीसह सोशल मीडिया व प्रिंट मीडियाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी दिग्रस तालुकाध्यक्षपदी धर्मराज गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत झोळ,सचिव आजीस शेख,कार्याध्यक्ष सैय्यद शोएब,प्रसिद्धी प्रमुख साजिद पतलेवाले,संघटक सदानंद जाधव,कायदेशीर सल्लागार ऍड.वैभव गव्हाणे आणि सदस्य म्हणून जुबेर खान,पृथ्वीराज चव्हाण,विठ्ठल राठोड,संतोष राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यक्रमात नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, ''पत्रकारांना न्याय मिळवून देणे, स्थानिक प्रशासनासोबत समन्वय ठेवून पत्रकार सुरक्षेची मागणी करणे, विविध योजनांची अंमलबजावणी आणि पत्रकार बांधवांना मार्गदर्शन करणे'' हे आपले प्रमुख उद्दिष्ट राहील. संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत सांगितले की, ''पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. व्हॉइस ऑफ मीडियाचा हेतू केवळ संघटना वाढवणे नसून, पत्रकारांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे हे आमचे ध्येय आहे.''

# भारतीय बौद्ध महासभेची लोणार तालुका कार्यकारिणी गठीत

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंडे**

**महारचिकना :** दि.१३ जुलै रविवार ला भारतीय बौद्ध महासभा बुलढाणा जिल्हा दक्षिणच्या वतीने भारतीय बौद्ध महासभेची लोणार तालुका कार्यकारणी गठीत करण्यात आली. सुलतानपूर येथील श्री शिवाजी हायस्कूल येथे लोणार तालुक्याची नवीन कार्यकारणी गठीत करण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली होती .या बैठकीसाठी भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक आद. भीमरावजी तायडे साहेब हे



प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सदर बैठक ही भारतीय बौद्ध महासभेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष आद.पी.बी इंगोले साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा सरचिटणीस अशोक काकडे साहेब, जिल्हा उपाध्यक्ष न.ल.खंडारे साहेब, जिल्हा सचिव आद.एस.के.साबळे सर ,जिल्हा संघटक विठ्ठल लांडगे साहेब प्रामुख्याने उपस्थित होते.या बैठकीमध्ये आद भिमरावजी तायडे साहेबांनी भारतीय बौद्ध महासभेचे कार्य आणि भविष्यातील वाटचाल याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीमध्ये भारतीय बौद्ध महासभेचे लोणार तालुकाध्यक्ष म्हणून आद. सुधाकर वानखडे साहेब यांची निवड करण्यात आली. सरचिटणीस पदी आद. राहुल अंभोरे ,कोषाध्यक्ष संतोष गवई सर, उपाध्यक्ष आद. सागर पनाड साहेब, शिवाजी डोंगरदिवे सर ,सतीश लांडगे ,हिशोब तपासणीसपदी एड. सुभाष लहाने साहेब, सचिवपदी आद. तुळशीदास घेवंदे सर,विजय वानखडे सर ,विनोद दाभाडे साहेब ,समाधान मोरे ,संघटकपदी अण्णा इंगळे, प्रल्हाद मोरे इत्यादी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आद.अशोक काकडे साहेब यांनी केले .या बैठकीसाठी ज्येष्ठ नेते डॉ. के.बी.इंगळे सर, शिवाजी आनंदराव सर ,आंबेडकरी नेते संघपाल पनाड,भाई बळीभाऊ मोरे, रतन मोरे ,युवा नेते भाई दीपक अंभोरे ,भाई मुरलीधर मोरे याची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच तालुक्यातील सिद्धार्थ अवसरमोल, भीमराव गवई, व्यंकटराव कदम, श्रीकृष्ण सरदार ,अनिल मोरे ,अर्जुन सरदार, रावसाहेब मोरे, अनिल पवार, नागसेनआनंदराव, भास्कर वानखडे, मंगेश मोरे ,अनिल लांडगे इत्यादी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदरणीय साबळे सर यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक, तर पडळकरांचा बॅनरवर गुंड म्हणून उल्लेख



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** विधिमंडळात गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक एकमेकांशी भिडले. या राड्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाचं वातावरण आहे. दरम्यान, बदलापुरात या घटनेनंतर तर जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी दुग्धभिषेक घातला. फुले, शाहू, आंबेडकरांचे पुरोगामी विचार मांडणारे जितेंद्र आव्हाड यांचा विचार दाबण्यासाठी त्यांच्यावर हा हल्ला करण्याचा पडळकर यांच्या गुंडांचं सगळं नियोजन होतं, असा आरोप यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला. जेव्हा जेव्हा अशा प्रकारे पुरोगामी विचारांवर हल्ला केला जाईल तेव्हा तेव्हा त्या विचारांचा प्रचार प्रसार करणाऱ्या नेत्यांना आम्ही दुग्धाभिषेक करू असं राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा म्हणणं आहे.

### ७२ तासांच्या उपचारानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांना जिल्हा रुग्णालयातून डिस्चार्ज



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** ७२ तासांच्या उपचारानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांना बीडच्या जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागातून डिस्चार्ज देण्यात आला. पती महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात न्याय मिळावा. या मागणीसाठी ज्ञानेश्वरी मुंडे १८ महिन्यांपासून पोलीस प्रशासनाचे उंबरठे झिजवत आहेत. मात्र न्याय मिळत नसल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात विष प्रशन करून आत्महत्येचा प्रयत्न ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केला होता. ७२ तास अतिदक्षता विभागात उपचार झाल्यानंतर त्यांना आज डिस्चार्ज देण्यात आला. तर पोलीस प्रशासनाला एक महिन्याचा अल्टिमेटम ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दिला. या प्रकरणात ८ तपास अधिकारी बदलून देखील एकाही आरोपीला अटक नाही. त्यामुळे आक्रमक पवित्रा ज्ञानेश्वरी मुंडे यांनी घेतला आहे. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर न्याय मिळेल, अशी अपेक्षा ज्ञानेश्वरी मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

### सातारा नगरपालिका निवडणुकीतील खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले मनोमिलन होणार का?




दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकणे जात असून, प्रत्येक नेते आपापल्या पक्षाची रणनीती ठरवत आहेत. साताऱ्यात देखील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. साताऱ्यातील खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले या दोन्ही बंधूंमध्ये खासदारकी आणि आमदारकीच्या निवडणुकीत मनोमिलन झाले होते. आता ते स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत देखील होणार का? याबद्दल माध्यमांनी खासदार उदयनराजे भोसले यांना प्रश्न विचारला असता, तुम्ही मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाच विचारा असे म्हणत मनोमिलनाचा चेंडू आता खासदार उदयनराजे भोसले यांनी आपले बंधू शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या गोटात ढकलला आहे. साताऱ्याला पाणीपुरवठा करणारे कास धरण पूर्ण क्षमतेने भरले असून, त्याचे आज ओटी भरण करण्यात आले. या वेळेला खासदार उदयनराजे भोसले बोलत होते.

# सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार येथे जागतिक सर्प दिनाच्या निमित्ताने 'सर्प शिक्षा अभियान' उत्साहात साजरे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** आज जागतिक सर्प दिनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी सापा विषयी माहिती व्हावी व त्यापासून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचं काम आज निसर्ग फाउंडेशन च्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार मध्ये करण्यात आलं यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्रीमान रामेश्वर डोळे होते तर मुख्य अतिथी म्हणून पर्यवेक्षक नंदकिशोर सांगळे हे होते.यावेळी निसर्ग फाउंडेशन च्या वतीने विनय कुलकर्णी यांनी विषारी सापांची ओळख करून दिली तर सचिन कापुरे यांनी बिनविषारी सापां बद्दल माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली त्यानंतर विनय कुलकर्णी यांनी परत महाराष्ट्रात आढळणाऱ्या सांपाविषयी सखोल माहिती देत विद्यार्थ्यांची सापाबद्दलची भीती दूर करत साप दिसला की आम्हा सर्प मित्रांना फोन करण्याचा आव्हान त्यांनी यावेळी केले व विद्यार्थ्यांना आपला दूरध्वनी(मोबाईल )क्रमांक

यावेळी सांगितला या सर्व कार्यक्रमांमध्ये त्यांच्यासोबत बंटी नरवडे, चंदू अंभोरे ,प्रतीक सुसर ,ऋषिकेश घाटोळकर ,समीर पटेल ,रेहान शेख, वैभव बाभूळवार, विलास खरात, उमेद चिपडे व मंडळ अधिकारी संतोष जाधव हे आवर्जून




उपस्थित होते. हा कार्यक्रम त्यांनी फक्त लोणारच नव्हे तर पुतळाबाई हायस्कूल लोणार ,श्री शिवाजी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय मोप ता.रिसोड जि.वाशिम याठिकाणी सुद्धा संपन्न झाला. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रवीण इंगळे यांनी केलं तर आभार प्रदर्शन विशाल थोरवे यांनी मानले.

## ओला, उबेर चालकांचे आंदोलन



**भिवंडी/प्रतिनिधी :** ओला, उबेर, रॅपिडो यांसारख्या ऑनलाइन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांनी चालकांसाठी लावलेले मनमानी दर बंद करून सरकारी मीटर दर लागू करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला भिवंडीत जोरदार प्रतिसाद मिळत आहे. या अन्यायकारक धोरणांचा निषेध करत शहरातील अवचित पाडा येथे चालकांनी जोरदार आंदोलन केले, तर आझाद मैदानावर विविध चालक संघटनांनी सुरू केलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ भिवंडीमध्ये देखील निषेध नोंदवला.

## उघड्यावर मांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध मनपाची पोलिसात तक्रार

दैनिक आपला विदर्भ



**चंद्रपूर/प्रतिनिधी :** शहरात बेकायदेशीरपणे मांस विक्री करणाऱ्यांवर मनपाने कारवाईचा बडगा उगारला असून, नागपूर रोडवर उघड्यावर बेकायदेशीर मांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मनपाचे अतिक्रमण कर्मचारी शक्ती हटवार यांच्या मार्फत रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मनपाचे उपद्रव शोध पथक १४ जुलै रोजी झोन क्र. १ अंतर्गत नागपूर रोडवर गस्त घालत होते. येथे बेस्ट कार डील्स परिसरात रोडलगत असलम शेख मुसा,विक्री विसटकर,रफिक शेख,फारुख शेख या ४ व्यक्ती अउघड्यावर बेकायदेशीरपणे मांस विक्री करीत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. त्यांना मांस विक्री परवाना, तसेच कत्तल खाण्यात बकरे कत्तल केल्यानंतर देण्यात येणाऱ्या पावतीबाबत विचारणा केली. दोन्हीही बाबी नसल्याचे समजताच बेकायदेशीरपणे मांस विक्री व मटण दुकानात अवैध कत्तल करून निरुपयोगी अवयव परिसरात फेकून दुर्गंधी पसरविल्याबद्दल संबंधिताविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे सामान जप्त करून दुकान काढण्यात आले आहे.

उघड्यावर मांस विक्री होत असल्याने दुर्गंधी निर्माण होते व धुळ,माश्या बसुन नागरिकांच्या आरोग्यावरही दुष्परिणाम होऊ शकतो.मांसविक्री केल्यानंतर घाण तेथेच टाकली जाते. यामुळे भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढतो. त्यामुळे उघड्यावर मांस विक्री करणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त विपीन पालीवाल यांनी दिली होते त्यानुसार तक्रार दाखल करण्यात आली असुन यापुढेही कारवाई केली जाणार आहे.

## तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खत टंचाईचा फटका; तहसील कार्यालयावर धडक देत आक्रमक आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुक्यात युरिया खताची तीव्र टंचाई जाणवत असून, त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे. खरीप हंगाम सुरू असूनही खत न मिळाल्याने अस्वस्थ झालेल्या शेतकऱ्यांनी गुरुवारी थेट तहसील कार्यालयावर धडक दिली. हातात रिकाम्या खताच्या गोण्या घेऊन आलेल्या शेतकऱ्यांनी तहसीलदारांना आपली व्यथा मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांच्या उद्रेकामुळे तहसील प्रशासन हालचालीत आले. तहसीलदारांनी तत्काळ तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधत खत पुरवठ्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाची गंभीर दखल घेत, ''तालुक्यात युरिया खताचा पुरवठा लवकरच सुरळीत होईल,'' असे आश्वासन तहसीलदारांनी दिले.

मात्र, जर लवकरात लवकर खत उपलब्ध झाले नाही, तर तालुका कृषी कार्यालयावर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा हेमंत पाटील सह शेतकऱ्यांनी यावेळी दिला. आंदोलनादरम्यान तालुक्यातील विविध भागातून आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही शेतकऱ्यांनी शासनाच्या नियोजनशून्यतेवरही तीव्र नाराजी व्यक्त केली.

तालुक्यात वेळेवर पेरण्या झाल्या असल्या, तरी खत न मिळाल्यास उगमावलेल्या पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरेने योग्य पावले उचलावी, अशी मागणी सर्वत्र होत आहे. आंदोलना वेळी हेमंत पाटील, विकी चौधरी, राधेश्याम चौधरी, लालू बोरसे, यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जळगाव मध्ये अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने घेण्यात आली आढावा बैठक

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव मध्ये अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या




वतीने जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली असून समता परिषदेचे कार्याध्यक्ष समीर भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक घेण्यात आली या बैठकीत जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये ओबीसी आरक्षण जातनिहाय जनगणना तसेच आगामी निवडणुकांमध्ये ओबीसी समाजाला जास्तीत जास्त प्रतिनिधित्व मिळण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# ड्रॅगन फ्रुटची शेती शेतकऱ्यांसाठी ठरत आहे फायद्याची; एकरी अडीच लाख खर्चात लाखोंची कमाई







दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी :** परंपरागत शेतीला फाटा देत ग्रामीण भागातील शेतकरी आता ड्रॅगन फ्रुटच्या शेतीकडे वळत आहेत. आकर्षक रंग, आरोग्यास फायदेशीर आणि बाजारात वाढती मागणी यामुळे या पिकाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, एकरी अडीच लाखांचा खर्च करून शेतकरी दरवर्षी पाच ते सात लाख रुपयांची कमाई करत आहे.

ड्रॅगन फ्रुटसाठी उष्ण हवामान अनुकूल असल्याने नंदुरबारसह खानदेशातील बऱ्याच जिल्ह्यांत हे पीक यशस्वी ठरत आहे. पाणी आणि खतांची तुलनेत कमी गरज, सातत्याने उत्पादन आणि निर्यातीच्या संधी यामुळे हे पीक शेतकऱ्यांच्या अर्थकारणासाठी वरदान ठरत आहे.ड्रॅगन फ्रुट हे कमी देखभाल आणि उच्च उत्पन्न देणारे पीक आहे. नंदुरबार तालुक्यातील हे अनेक शेतकरी आता ड्रॅगन पुढच्या शेतीकडे वळले आहे.नंदुरबार तालुक्यातील शिंदे गावातील प्रकाश पटेल यांनी आपल्या ८ एकरच्या शेतीमध्ये ड्रॅगन फूट ची लागवड केली आहे. त्यांना प्रत्येकी एकरी अडीच लाखाच्या खर्च आला असून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत आहे. ड्रॅगन फ्रुटचा मालाला नंदुरबार जिल्हा नव्हे तर जवळच्या मध्य प्रदेश व गुजरात राज्यातून देखील मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यां कलआता नवीन पिकाकडे दिसत असल्याने कृषी विभाग व कृषी विज्ञान केंद्रेतर्फे परिसरातील शेतकऱ्यांना लागवड, खत व्यवस्थापन, रोग नियंत्रण व बाजारपेठ बद्दल वेळोवेळी माहिती दिली जात आहे. ड्रॅगन फ्रूट ही शेती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी नवीन आर्थिक संधी निर्माण करत आहे. कमी खर्चात अधिक नफा आणि सातत्याने उत्पादन मिळणारे हे पीक भविष्यात शेतकऱ्यांचे आर्थिक चित्र बदलू शकते. कृषी विभागामार्फत मार्गदर्शन आणि लागवडीसाठी सहाय्य दिलं जातं. शेतकऱ्यांनी पुढाकार घेतल्यास हे पीक आर्थिक क्रांती घडवू शकतं. ड्रॅगन फ्रुट शेतीचा हा यशस्वी फॉर्म्युला आणखी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्यास, ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही.

## विविध वृत्त...

### सोमवारी महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जूलै महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. २१ जूलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

### जिल्हामध्ये जुलै महिन्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन; ४३ लाखांचा दंड वसूल



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यात २०२५ च्या जून महिन्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात झाले असून, अशा वाहनचालकांविरुद्ध जिल्हा वाहतूक शाखेने कठोर कारवाई केली आहे. हेल्मेट न घालणे, सीट बेल्ट न लावणे, सिग्नल जंप करणे, वनवे आणि नो एंट्रीचा उल्लंघन करणे अशा प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात नियमभंग करण्यात आला. या कारवाईत एकूण ४३ लाख ५१ हजार ५०० रुपयांचा दंड विविध गुन्ह्यांकरिता वाहनचालकांकडून वसूल करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नागेश भास्कर यांनी दिली. वाहतूक पोलिसांनी जनतेला आवाहन केलं आहे की, वाहन चालवताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. नियम मोडणाऱ्यांवर पुढील काळात आणखी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### चंद्रपूर मनपामार्फत १६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून, त्यामध्ये दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत शिष्यवृत्ती योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता शिक्षण घेत असलेल्या १६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना मनपामार्फत वार्षिक शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली आहे.

यात इयत्ता १ ते ८ वीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ५ हजार रुपये, इयत्ता ९ ते १२ साठी १० हजार रुपये,डिप्लोमा / पदवी / पदव्युत्तर (BA, BCom, BSc, पॉलिटेक्निक) करणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ हजार रुपये तर व्यावसायिक शिक्षण जसे इंजिनिअरिंग, मेडिकल इत्यादी कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ हजार रुपयांची वार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता इयत्ता १ ते ८ मधील ११९ विद्यार्थी, इयत्ता ९ ते १२ मधील ३७ विद्यार्थी,डिप्लोमा / पदवी / पदव्युत्तर करणाऱ्या ४ तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या १ अश्या १६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना १० लक्ष ५० हजार रुपयांचा निधी शिष्यवृत्तीच्या रूपाने वितरित करण्यात आला आहे.यासाठी ४०% किंवा त्याहून अधिक दिव्यांगत्व ही पात्रता मानण्यात येते. सर्व शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातुन मनपाच्या शहर प्रकल्प अधिकारी यांच्याकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज पाठविण्यात येतात.

ही योजना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देणारी असून त्यांच्या आत्मनिर्भरतेसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. यापुढे देखील चंद्रपूर महानगरपालिका समाजातील सर्व घटकांसाठी समावेशी आणि कल्याणकारी योजना राबविण्यास वचनबद्ध आहे.अधिक माहितीसाठी दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कार्यालय, बी.पी.एल. ऑफीस, ज्युबली हायस्कुल समोर येथे संपर्क साधता येईल.



# स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सत्ता हस्तगत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घ्यावे, पक्ष संघटन,पक्षशिस्त, पदाधिकारी कार्यकर्त्यांमधील समन्वय हा महत्त्वाचा. त्यामुळे शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सर्व नियोजन करून कामाला लागावे, असे आवाहन केंद्रीय आयुष ,आरोग्य ,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

प्रतापराव जाधव शेतकरी भवनात आज आयोजित करण्यात आलेल्या मेहकर ,लोणार, सिंदखेडराजा, देऊळगावराजा ,चिखली तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात त्यांनी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर, जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, ओमसिंग राजपूत ,युवा सेनेचे जिल्हा प्रमुख ऋषिकेश जाधव,महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख मायाताई म्हस्के यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिवसेना तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, भगवानराव सुलताने यांनी मान्यवरांचे स्वागत केले.आपल्या भाषणात प्रतापराव जाधव यांनी शिवसेनेचा संपूर्ण इतिहास कथन करत सांगितले की, सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने संघर्ष करणारी शिवसेना एकमेव पक्ष आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या अमोल विचारावर पक्षाचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात बळकटपणे पक्ष कार्यरत आहे. पक्षाची संघटनात्मक शक्ती वाढवण्यासाठी शिवसेना पक्षाची सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करण्याचे पदाधिकाऱ्यांना त्यांनी आवाहन केले.आपल्या भाषणात माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, समाजकारणावर अधिक भर देणारा आपला पक्ष आहे. कार्यकर्त्यांचे कर्तुत्व आणि त्यांची बळकट एकनिष्ठता हीच पक्षाची ताकद आहे, बलस्थान आहे. पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने सोबत घेऊन सज्ज रहावे. ऋषिकेश जाधव यांनी आपल्या भाषणातून युवा सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले. यावेळी माजी आमदार शशिकांत खेडेकर,बळीराम मापारी यांनी जिल्हा, तालुका व शहर आणि ग्राम पातळीवरील बूथ प्रमुख ,शाखाप्रमुख यांनी सदस्य नोंदणीचे काम वेगाने करावे जनसंपर्क वाढवावा आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत समित्या नगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने आपली कार्यक्षमता वाढवावी, असे आवाहन केले. शहर प्रमुख जयचंद बाठीया यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.तर, युवासेनेचे नेते नीरज रायमुलकर यांनी आभार मानले.

## गौण खनिज माफियाने चार तलाठ्यांच्या अंगावर घातला टिप्पर; जलंब पोलिसांत गुन्हा





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अवैध मुरुमाचा टिप्पर तहसीलमध्ये घेऊन जाण्याचे सांगणाऱ्या महसूल पथकाच्या अंगावर वाहन नेत चौघांना चिरडण्याचा प्रयत्न केल्याची घटना बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव तालुक्यातील कोक्ता शिवारात घडली. याप्रकरणी तलाठ्याच्या तक्रारीवरून पिंप्री देशमुख येथील टिप्पर मालक गोविंद फुंडकरसह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

खामगाव येथील तहसीलदार सुनील पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार अवैधरित्या गौण खनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक कारवाई करीत असताना विशाल अशोकराव देशमुख हा त्याच्या ताब्यातील टिप्परमध्ये अवैध रित्या गौण खनिज घेऊन येताना दिसला त्याला महसूल कर्मचा-यांनी धांबवून रॉयल्टी आहे का, याबाबत विचारपूस केली असता टिप्पर चालकाकडे रॉयल्टी नसल्याने टिप्पर चालकांनी महसूल कर्मचाऱ्यांना सांगितले व त्याने त्याच्यात ज्यातील आयशर कंपनीचे विना क्रमांकाचे असलेले पिवळ्या रंगाचे टिप्पर हे फिर्यादी व साक्षीदार यांच्या अंगावर आणून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फियादी हत्यांच्यासोबत असलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांना लोटपाट करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या घटनेमध्ये महसूल पथकातील साक्षीदार शैलेश सारंगधर बाठे, अंकुश अशोक अग्रवाल, संजय रामदास काळमेघ हे तीन कर्मचारी जखमी झाले. अशी तक्रार ग्राम महसूल अधिकारी राहुल अशोक चौधरी यांनी जलंब पोस्टला दिली यावरून पोलिसांनी टिप्पर चालक विशाल अशोकराव देशमुख व मालक गोविदा फुंडकर रा. पित्री देशमुख यांच्याविरुद्ध प्राण घातक हल्ला केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेद्वार अमोल सांगळे करीत आहेत.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

- सांस्कृतिक कार्य विभागाचा उपक्रम
- ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक
- गणेश मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि. २० जुलै २०२५ पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु.२५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी २२ जुलै रोजी खामगाव येथे रोजगार मेळावा आणि मार्गदर्शन सत्राचे आयोजन; चिखली येथे प्लेसमेंट ड्राइव्ह

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळाव्यात आणि त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत खामगाव आणि चिखली येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा दि. २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता खामगाव येथील श्री सिध्दीविनायक टेक्निकल कॅम्पस, जिल्हा शेगाव रोड येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच याच दिवशी सकाळी १०.३० वाजता जि. एस. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना याबाबत विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे.

चिखली येथे प्लेसमेंट ड्राइव्ह

याशिवाय, दुपारी १.०० वाजता श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची नोंदणी प्रक्रिया, स्वयंरोजगार संधी आणि प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आले आहे. या ठिकाणी देखील नामांकित कंपन्यांकडून भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. या रोजगार मेळाव्यासाठी पात्र उमेदवारांनी आपले बायोडेटा, फोटो व शैक्षणिक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

"जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार व प्रशिक्षणाच्या संधी मिळाव्यात हा आमचा मुख्य उद्देश आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा." - गणेश प्र. बिटोडे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा

## जागतिक लोकसंख्या दिन सप्ताह उत्साहात: उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा गौरव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दिनांक १६/०७/२०२५ रोजी तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली यावेळी दिनांक ११ ते १८ जुलै जागतिक लोकसंख्या दिन सप्ताहाचे औचित्य साधून मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते सर यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक लोकसंख्या दिन सप्ताह छत्रपती शिवाजी महाराज सभागृह जिल्हा परिषद बुलढाणा येथे साजरा करण्यात आला.

याप्रसंगी कुटुंब कल्याण कार्यक्रमात उत्कृष्ट काम केलेले प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांचा व निर्देशांक निहाय उद्दीष्ट पुर्ण केलेली प्रा. आ. केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यामध्ये प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान व आढावा सभा जागतिक आरोग्य संघटक डॉ. सम्यक खैरे, जिल्हा क्षयरोग काधिकारी डॉ वर्षा गुट्टे मॅडम, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांच्या उपस्थितीत पार पडली.






यावेळी आयुष तथा जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, जिल्हा प्रशिक्षण संघ वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरी, जिल्हा हिवताप अधिकारी शिवराज चव्हाण, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेश धुताडमल, सर्व तालुका आरोग्य अधिकारी व सर्व प्रा. आ. केंद्रातील वैद्यकीय अधिकारी इतर अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन आरोग्य सहाय्यक प्रशांत पवार यांनी केले.